**नि.ख.क. :- १३/१८**
**सरकार - वि - राकेश**
**नि.क :- १७**

**सरकारतर्फे साक्षदार क. ०२ यांची साक्ष**
**मी शपथेवर सांगतो की,-**

**नाव - रमेश गोविंदराव उकेबोंद्रे**
**वय - ५३ वर्ष.**
**धंदा - नौकरी**
**पत्ता - पारशिवनी त-पारशिवनी, जिल्हा नागपूर.**

**सरतपास अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही. पी. थोटे**

०१. दिनांक ३१.१०.२०१७ रोजी पोलिसांनी मला सुचनापत्र दिले नव्हते. आता मला सुचनापत्र दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीती नाही. सुचनापत्र अगोदरच नि. १५ वर आहे.

०२. पोलिस ठाणे पारशिनी येथे आरोपी हा हवालत मध्ये असतांना आरोपीने माझया समक्ष काही काढुन दिले. नाही. माझया समक्ष पोलिसांनी काही जप्त केले नाही. मी पंचनाम्यावर फकत सही केली. आता मला घ टनास्थळ जप्ती पचंनामा दाखविला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीती नाही. घटनास्थळ जप्ती पचंनामा अगोदरच नि. १६ वर आहे. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला नव्हता.

**(सदर साक्षीदार हा पंचनाम्याप्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे त्यास उलटतपासात विचारण्यात येणारे उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची सहायक सरकारी अभियोक्ता यांनी परवानगी मागीतली व ती देण्यात आली).**

DISTRICT COURT NAGPUR

०३. मी वनविभाग कार्यालय पारशिवनी या ठिकाणी वनमजुर म्हणुन गेल्या २३ वर्षापासुन काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी शासकीय कागदपत्र वाचुनच सही करीत असतो. मला सहीचे महत्व कळते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांसोबत बस स्थानक पारशिवनी येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझया समक्ष बस स्थानक पारशिवनी येथे आरोपीच्या ताब्यातुन एक देशी कट्टा जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला जप्ती पचंनामा वाचुन दाखविला होता.

०४. माझया जबाबातील रेखांकीत भाग अ मी पोलिसांना सांगीतला नव्हता. परंतु तसे माझया जबाबात का लिहीण्यात आले याचे कारण मी सांगु शकत नाही.

**<u>उलटतपास आरोपीसाठी श्री. ए. बी. बोकडे वकील साहेब.</u>**

०५. नाकारले.

**<u>उलटतपास संपला</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-
(सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
पारशिवनी.

समक्ष

स्वा/-
(सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
पारशिवनी.

दिंनाक :- ०७/०३/२०१९

DISTRICT COURT NAGPUR